# उल्हासनगर महानगरपालिका

## जाहीर नोटीस

संदर्भ :— १. मा.प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई—३२ यांना पाठविलेले या कार्यालयाचे पत्र क्र. उमपा/नरवि/जीआर/४१/१७ दि.३०.११.२०१७

२. सहसंचालक, नगररचना, कोकण विभाग यांचेशी उल्हासनगर विकास योजनेस मुदतवाढ मिळणेबाबत दि.०६.१२.२०१७ रोजी दुरध्वनीद्वारे झालेली चर्चा.

महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३१ (१) अन्वये राज्य शासनाने उल्हासनगर शहराच्या विकास आराखडयास दि.२१.०४.२०१७ रोजीच्या आदेशान्वये मंजूरी दिलेली आहे. सदर मंजूरी देताना काही भाग विकास आराखडयातून वगळण्यात आला असून त्याची परिपूर्ण माहिती महानगरपालिकेच्या संकेतस्थळ www.umc.gov.in वर उपलब्ध आहे.

वगळण्यात आलेल्या भागासाठी नागरिकांच्या हरकती व सूचना असल्यास सर्व सबंधीतांनी दि.०४.०१.२०१८ पर्यंत सहसंचालक, नगररचना, तिसरा मजला, कोकण विभाग, कोकण भवन, बेलापूर, नवी मुंबई या ठिकाणी वगळण्यात आलेल्या भागाची क्रमांक नमुद करुन योग्य त्या दस्ताऐवजासह सादर करावे.

13.12.2017

आयुक्त
उल्हासनगर महानगरपालिका

क्र.उमपा/नरवि/सा/ १५८/
दिनांक : १३ /१२/२०१७